AvianMedia

**Loksatta**

**Thursday, September 17th, 2009 (Mumbai)**

**Page No- 12**

# डेव्हिस चषक लढत निओ स्पोर्ट्सवर

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील विश्व गट प्लेऑफ डेव्हिस चषक लढतीचे निओ स्पोर्ट्स वाहिनीवर थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. जोहान्सबर्ग येथील एलिस पार्क इन्डोअर अरेना येथे ही स्पर्धा होत आहे. १८ सप्टेंबरला भारतीय वेळेनुसार दुपारी ३.३० वाजता पहिल्या दिवसाचा खेळ दाखविला जाईल तर दुसऱ्या दिवशीचा खेळ सायंकाळी ४.३०वाजता प्रक्षेपित होईल. २० सप्टेंबरला अंतिम दिवस असून त्या दिवशी ३.३०वाजता प्रक्षेपण केले जाणार आहे.

भारतीय संघ - सोमदेव देववर्मन, रोहन बोपण्णा, महेश भूपती, युकी भांबरी. न खेळणारे कर्णधार : एस. पी. मिश्रा. ■